# प्रकरण ८.
# भारतीय चलन व्यवस्था



- भारतात १९५७ पूर्वी एक पैसा , एक आणा, चार आणे, आठ आणे अशा प्रकारची नाणी अस्तित्वात होती. १९५५ मध्ये ‘‘नाणे दुरुस्ती कायदा’’ संमत करण्यात आला.
- या कायद्यानुसार १ एप्रिल १९५७ रोजी ‘दशमान चलन पद्धती’’ अस्तित्वात आली. त्यानुसार एक रुपया समान १०० पैशांमध्ये विभागीत करण्यात आला.
- त्यानुसार मार्च १९६२ मध्ये पहिला नवा पैसा अस्तित्वात आला. जुलै १९६२ मध्ये पहिला नवा रुपया अस्तित्वात आला.

## ➢ भारतीय चलन :-

- भारतीय चलन पद्धतीचे व्यवस्थापन RBI तर्फे केले जाते. भारतीय चलनामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

### १. नाणी (Coins) :-



- निकेल व त्याच्या संयुगांपासून नाणी बनवली जातात.
- ५० पैसे, १ रु, २रु., ५ रु., व १० रु. अशा किंमतीची नाणी चलनात आहे, (३० जून २०११ पासून ५० पैशापेक्षा कमी मूल्याची सर्व नाणी चलनातून काढून घेण्याचे रिझर्व्ह बँकेने ठरविले आहे. त्यामुळे देशातील सर्वात कमी मूल्याचे विधीग्राहय चलन ५० पैशाचे नाणे असेल.)
- सर्व नाणी भारत सरकारमार्फत ‘नाणे कायदा – १९०६’ अंतर्गत तयार केली जातात. मात्र RBI मार्फत चलनात आणली जातात. २०११ मध्ये १९०६ च्या कायद्यात बदल करण्यात येत असून त्याजागी नवीन ‘नाणे कायदा – २००९ लागू करण्यात येत आहे.
- नवीन कायद्यामध्ये नाण्यांच्या साहाय्याने पेमेंट करण्यासाठी व पेमेंट स्विकारण्यासाठी महत्तम सीमा १००० रुपयांची निर्धारित करण्यात आली आहे.
- भारत सरकारच्या टाकसाळी पुढील ठिकाणी आहेत – मुंबई, अलीपूर, (कोलकाता), सैफाबाद (हैद्राबाद), चेरलापल्ली (हैद्राबाद) आणि नोएडा.
- १९०६ च्या कायद्यांतर्गत भारत सरकार १००० रुपयांपर्यंतचे नाणे तयार करु शकते.
- ८ नोव्हेंबर २०१६ रोजी ५०० व १००० च्या नोटाबंदीची घोषना करण्यात आली.



### २. चलनी नोटा (Currency Notes) :-

- नोटांमध्ये १ रु, २ रु, ५ रु, १० रु, २० रु, ५० रु, १०० रु, २०० रु., ५०० रु. आणि १,००० रु. रुपयांच्या नोटांचा समावेश होतो.
- १ रुपयाची नोट भारत सरकारच्या अर्थमंत्रालयाकडून छापली जाते तर RBI मार्फत चलनात आणली जाते. तिच्यावर सही अर्थमंत्रालयाच्या अर्थ / वित्त सचिवाची असते.
- इतर सर्व नोटा RBI मार्फत छापल्या व चलनात आणल्या जातात. त्यांच्यावर सही RBI च्या गव्हर्नरची असते. सर्व नोटा वचनचिठ्ठीच्या (Promisory Note) स्वरुपात असतात.
- १,००० रुपयाची नोट १९७८ मध्ये काढून घेण्यात आली होती. ती पुन्हा ९ ऑक्टोबर २००० रोजी चलनात आणण्यात आली. RBI सर्वाधिक म्हणजे, १०,००० रुपयांपर्यंत किंमतीची नोट छापू शकते.

#### एक रुपयाची नोट चलनात २० वर्षांनंतर :-

- सुती कापडाचा वापर करुन तयार (११० मायक्रॉन)
- वजन – ९० gm/square
- जुनी रुपयाची नोटही वैध
- सत्यमेव जयते सह अशोक स्तंभ
- उजव्या हाताला ‘भारत’ नाव

- रंग - गुलाबी-हिरवा
- नोव्हेंबर १९९४ मध्ये बंद केली होती.
- १९९५ (२ व ५ च्या नोटा बंद)
- १ रुपयाच्या नोटेवर RBI गव्हर्नरऐवजी वित्त सचिवाची सही (हिंदी व इंग्रजी)
- ६ मार्च २०१५ रोजी राजस्थानातील नाथद्वारा येथील श्रीनाथजी मंदिरात केंद्रीय वित्त सचिव राजीव महर्षी यांनी या नोटेचे अनावरण केले.

## ❖ चलनाला पुढील प्रकारे संबोधले जाते :-

### १. प्रतिक / सांकेतिक चलन (Token Money) :-

- चलनाची दर्शनी किंमत (Face Value) त्यातील समाविष्ट धातूच्या अंतर्भूत किंमतीपेक्षा (Intrinsic Value) पेक्षा खूप अधिक असते. म्हणून त्याला प्रतिक चलन म्हणतात. या दोन्ही किंमती जेव्हा समान असतात. तेव्हा चलनाला प्रामाणिक चलन (standard money) असे म्हणतात. १८९३ पर्यंत भारतात प्रचलित असलेला. चांदीचा रुपया प्रामाणिक चलन होते.
- चलनी नोटांना तर जवळजवळ अंर्तभूत किंमत नसते.

### २. कायदेशीर चलन (Legal Tender) : याचे दोन प्रकार आहेत.

अ) मर्यादित कायदेशीर चलन - एका कमाल रकमेपर्यंतचेच पेमेंट यांद्वारे करतात येते.

ब) अमर्यादित कायदेशीर चलन :–

- इतर सर्व नाणी व नोटा अमर्यादित कायदेशीर चलन असतात. त्या कमाल रकमेपेक्षा पुढील रक्कम असल्यास मर्यादित चलनाच्या स्वरुपातील पेमेंटला नकार येतो व अमर्यादित चलनाचा आग्रह धरता येतो.
- बँकाच्या मागणी ठेवी (Demand Deposits) ह्या कायदेशीर चलन नसतात. म्हणजेच धनादेशामार्फत केलेले पेमेंट नाकारता येते व रोख पैशाचा आग्रह धरता येतो.

## भारतातील छापखाने व टांकसाळी (Presses & Mints)

१. इंडियन सिक्युरिटी प्रेस, नासिक रोड ( १९२८ ला स्थापना ) :-
- पोस्टाची व कोर्टाची तिकिटे व इतर कागदपत्रे
- धनादेश, बाँडस् NSC, IVP, KVP
- राज्य सरकारे, सर्व उद्योग वित्तीय संस्था यांचे रोखे

२. करन्सी नोटस् प्रेस, नासिक रोड :- रु. १, २, ५, १०, ५०, १००, ५००, १००० च्या नोटा येथे छापल्या जातात.

३. बँक नोटस् प्रेस, देवास (१९७५ ला स्थापना) – येथे २ कारखाने आहेत.
- रु. २०, ५०, १००, ५०० च्या नोटा
- शाईची फॅक्टरी - नोटा व रोख्यांसाठी आवश्यक

४. सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेस, हैद्राबाद :- दक्षिणेच्या राज्यांची पोस्टाच्या कागदापत्रांची गरज भागविण्यासाठी या छापखान्याची स्थापना १८८२ मध्ये करण्यात आली.

५. सिक्युरिटी पेपर मील, होशंगाबाद :- नोटा व रोख्यांसाठी लागणाऱ्या कायदाचे उत्पादन

६. टांकसाळी (Mints) – मुंबई, कोलकाता, हैद्राबाद, नोयडा

७. आधुनिक करन्सी नोटस् प्रेस– म्हैसूर व सालबोनी (प. बंगाल) येथे

## ❖ चलनाचे काही विशेष रुप :-

१. **सुलभ चलन (Soft Currency)** - असे चलन ज्याची मागणी कमी व पुरवठा अधिक असते त्याला सुलभ चलन म्हणतात.

२. **दुर्लभ चलन (Hard Currency)** - असे चलन ज्याची मागणी अधिक व पुरवठा कमी असतो. त्याला दुर्लभ चलन म्हणतात.

**❖ चलन पुरवठा (Money Supply) :-** चलन पुरवठा किंवा पैशाचा पुरवठा म्हणजे कोणत्याही विशिष्ट वेळी अर्थव्यवस्थेत चलनात असलेली पैशाची संख्या होय. (Money supply refers to the amount of money which is in circulation in an economy at any given time) .चलन पुरवठा म्हणजे देशातील लोकांजवळ असलेल्या रकमा अदा करण्याच्या एकूण साधनांचा साठा होय. देशातील लोक म्हणजे विविध कारणांसाठी पैसा जवळ ठेवणारे सर्व व्यक्ती व सर्व संस्था होत.

१. चलन पुरवठयात पुढील पैशाचा समावेश केला जातो.
२. लोकांच्या हातातील पैसा
३. लोकांच्या बँकामधील ठेवी
४. स्थानिक सरकारे, बँकेतर वित्तीय संस्था, सार्वजनिक प्रमंडळे यांच्या जवळील पैसा.
५. परकीय मध्यवर्ती बँका, आंतराष्ट्रीय नाणेनिधी, इतर देशातील सरकारे व संस्था इत्यादींनी भारतीय चलनाच्या स्वरुपात RBI मध्ये ठेवलेल्या ठेवी.

- मात्र चलन पुरवठयात पुढील पैशाचा समावेश केला जात नाही.
  १. केंद्र व राज्य सरकारे यांना RBI मधील व त्यांच्या खजिन्यातील पैशाचे साठे.
  २. व्यापारी बँकाचा स्वत:चा पैसा (Money lying with the banks) सरकार व व्यापारी बँका जवळील पैशाचा समावेश चलन पुरवठयात करण्यात येत नाही. कारण ते स्वत: पैशाचे उत्पादक आहेत.

## ➢ RBI चा चलन पुरवठा मोजण्याच्या पद्धती :–

- १९७७ पूर्वी RBI फक्त $M_{१}$ या पद्धतीचा वापर करीत होती.
- जानेवारी १९७७ पासून RBI ने इंग्लंडमधील रॅडक्लिफ समितीच्या शिफारसीनुसार चलन पुरवठयाच्या चार मापन पद्धतींचा वापर सुरू केला – $M_{१}$, $M_{२}$, $M_{३}$ ,व $M_{४}$

### पुरवठयाच्या चार मापन पद्धती

| जुन्या पद्धती | नव्या पद्धती | रोखात मापन पद्धती |
|---|---|---|
| १) $M_{१}$ = लोकांजवळील चलनी नोटा व नाणी +लोकांच्या बँका – मधील मागणी ठेवी + RBI मधील इतर ठेवी | १) $M_{१}$ = संकल्पनेत बदल करण्यात आला नाही. | १) $L_{१}$ = नवीन $M_{३}$ + पोस्ट ऑफिस बचत बँकेतील सर्व ठेवी (NSC वगळता) |
| २) $M_{२}$ = $M_{१}$ + पोस्ट ऑफिस बचत बँकेतील बचत ठेवी | २)$M_{२}$ = $M_{१}$ + बँकांमधील बचत ठेवीपैकी मुदत ठेवी + बँकांनी विकलेल्या CDs चे पैसे + १ वर्षापर्यंतच्या मुदत ठेवी | २)$L_{२}$ = $L_{१}$ + Fis कडील मुदत ठेवी + Fis कडील मुदत कर्जे + Fis कडील CDs |
| ३) $M_{३}$ = $M_{१}$ + बँकामधील मुदत ठेव | ३) $M_{३}$ = $M_{२}$ +१ वर्षापेक्षा जास्त काळाच्या मुदत ठेवी + बँकेची मागणीदेय व मुदती कर्जे | ३) $L_{३}$ = $L_{२}$ + NBFC कडील लोकांच्या ठेवी |
| ४) $M_{४}$ = $M_{३}$ + पोस्ट ऑफिसमधील सर्व ठेवी | ४) $M_{४}$ = ही संकल्पना रद्द करण्यात आली आहे. | |

- मात्र डिसेंबर १९९७ साली स्थापन करण्यात आलेल्या डॉ. वाय. व्ही. रेड्डी कार्यगटाने आपल्या जून १९९८ च्या अहवालात या संकल्पनामध्ये बदल सुचविले आहेत. तसेच त्यांनी नवीन रोखता मापन पद्धतीच्या संकल्पना सुद्धा सुचविल्या आहेत. त्यानुसार चलन पुरवठयाच्या जुन्या व नव्या मापन पद्धती आणि नवीन रोखता मापन पद्धती तत्क्यात दिल्या आहेत.
- संकल्पनेच्या दृष्टीने $M_{१}$ म्हणजे पैशाचा पुरवठा $M_{३}$ म्हणजे एकूण पैसा रुप साधनसंपत्ती. $M_{१}$ हे मापन पैशाची परंपरागत मर्यादित व्याख्या देते. तर $M_{३}$ पैशाची व्यापक व्याख्या देते. म्हणून $M_{१}$ ला ''संकुचित पैसा'' (Narrow Money) तर $M_{३}$ ला ''व्यापक'' किंवा ''विस्तृत पैसा'' असे म्हणतात.

## ❖ भारतीय रुपयाचे स्वतंत्र चिन्ह :-

- अमेरिकन डॉलर, ब्रिटिश पाऊंड, जपानी येन व युरोपीय संघाचे युरो या चार चलनानंतर भारताचा रुपया हे पाचवे असे चलन आहे ज्यास स्वत:चे स्वतंत्र चिन्ह (symobl) असेल. चिन्हाच्या निवडीसाठी वित्त मंत्रालयाने एक राष्ट्रीय स्पर्धा आयोजित केली. होती. आलेल्या सुमारे ३००० नमुन्यांपैकी मुंबई आय. आय. टी. चे पोस्ट ग्रॅज्युएट असलेल्या श्री. डी. उदय कुमार यांच्या चिन्हाची निवड रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गर्व्हनर उषा थोरात यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीने केली, ज्यास केंद्रीय मंत्रीमंडळाच्या १५ जुलै , २०१० च्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

## ❖ १० रुपयांचे नाणे :-

१. रिझर्व्ह बँकेने १० रुपयाचे नाणे अलिकडे प्रचलित केले आहे. त्याची डिझाईन नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ डिझाईन, अहमदाबाद येथे करण्यात आली आहे. त्याची कल्पना विविधता एकता (Unity in Diversity) अशी आहे. हे नाणे द्वि – धात्विक (Bi – metallic) असून त्याची बाहेरील कडा निकेल - ब्रॉंझची आहे, तर मधला भाग फेरस स्टिलचा आहे.



## ट्रेझरी बिल म्हणजे काय?

- ट्रेझरी बिलांची विशिष्ट दर्शनी किंमत असते. असं समजूया, की एका ट्रेझरी बिलाची दर्शनी किंमत १ लाख रु. आहे. RBI या बिलचे लिलाव करते. आणि दर्शनी किंमतीपेक्षा कमी किंमतीने ही बिले विकली जातात. समजा, ही बिल ९९५०० ला विकले गेले. काही विशिष्ट मुदतीनंतर RBI ही बिले परत विकत घेते. समजा, या ट्रेझरी बिलांची मुदत ९१ दिवसांची होती. तर ९१ व्या दिवशी RBI गुंतवणुकदाराला १ लाख रु. देऊन ट्रेझरी बिल परत घेईल.

## वरील व्यवहाराने काय झाले?

- भारतीय शासनाला ९१ दिवसांसाठी नाणेबाजारातून कर्ज उभारता आले.
- गुंतवणूकदाराला ५०० रु. व्याज मिळाले. हे व्याज खुप जास्त नसले तरी गुंतवणूक जोखीम विरहीत होती. अल्पकाळासाठी पैसा गुंतवला गेला.

★★★★★★★★★★★★★★★★★★★★

# प्रकरण ९.
# चलनवाढ

अर्थव्यवस्थेतील विविध वस्तू व सेवा यांच्या किंमती वारंवार बदलत असतात. या किंमतीत वाढ घडून येण्याची प्रवृत्ती वारंवार आढळून आल्यास त्या अवस्थेचे वर्ण 'भाववाढ' किंवा किंमतवाढ म्हणून केले जाते. अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने ही किंमतवाढ नियंत्रित स्वरुपात असणे अपेक्षीत असते. त्यामुळे किंमतवाढ नियंत्रण हे RBI चे एक महत्वाचे कार्य ठरते.




| चलनवाढ | चलनघट |
|---|---|
| १) अर्थ-एखाद्या विशिष्ट कालावधी मध्ये वस्तू व सेवांच्या साधारण किंमत पातळीत होणारी सततची वाढ. | १) अर्थ-एखाद्या विशिष्ट कालावधी मध्ये वस्तू व सेवांच्या साधारण किंमत पातळीत होणारी सततची घट. |
| २) त्यामुळे चलनाची खरेदीशक्ती कमी होते. | २) त्यामुळे चलनाची खरेदीशक्ती वाढते. |
| ३) वस्तू व सेवांची मागणी वाढलेली असते. | ३) वस्तू व सेवांची मागणी कमी झालेली असते. |
| ४) रोजगारनिर्मिती क्षमता वाढते. | ४) रोजगारनिर्मिती क्षमता कमी होते. |
| ५) त्यामुळे बेरोजगारी कमी होते. | ५) त्यामुळे बेरोजगारी वाढते. |
| ६) याचा फायदा ऋणकोंना, तर तोटा धनकोंना होतो. | ६) याचा फायदा धनकोंना तर तोटा ऋणकोंना होतो. |


## ➢ भाववाढ (महागाई) बाबत महत्त्वाच्या संकल्पना :-




### ❖ मुद्रास्फिती (Inflation) :-




- मुद्रास्फिती होणे म्हणजे भाववाढ होणे. वस्तूंच्या सतत वाढ होणे हे मुद्रास्फितीचे प्रमुख लक्षण मानले जाते. ज्यावेळी देशातील वस्तू व सेवा यांची परिणामकारक मागणी पुरवठयापेक्षा जास्त असते, त्यावेळी वस्तूंच्या किंमतीत सतत वाढ होत राहते. अशावेळी मुद्रास्फिताची परिस्थिती निर्माण होते.






### ❖ मुद्रा अस्फिती (Deflation) :-

- अस्फितीला मुद्रा संकोच असे सुध्दा म्हणतात. ही मुद्रास्फितीच्या विरुद्धची परिस्थिती मानली जाते. ज्यावेळी देशातील वस्तू व सेवा यांची परिणामकारक मागणी पुरवठयापेक्षा कमी होते, त्यावेळी वस्तूंच्या किंमतीत सतत घट होत राहते. अशावेळी देशात अस्फिताची परिस्थिती निर्माण होते.

### ❖ मुद्रा अपस्फिती (Dis–Inflation) :-

- मुद्रास्फितीवर नियंत्रण मिळविण्याकरिता शासन त्यावर उपाययोजना करते, या उपाययोजनेला अपस्फिती असे म्हणतात.





### ❖ मुद्रा संस्फिती (Reflation) :-

- अर्थव्यवस्थेतील मंदीची अवस्था टाळण्यासाठी किंवा अस्फितीवर नियंत्रण मिळविण्याकरिता शासनाने जाणीवपूर्वक केलेल्या उपाय योजनेला संस्फिती असे म्हणतात. यामध्ये वस्तुंच्या किंमती वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. मुद्रास्फितीची कारणे हीच संस्फितीची उपाययोजना होय.




### ❖ मुद्रा अवपात (Stagflation) :-

- अर्थव्यवस्थेमध्ये जेव्हा भाववाढ व आर्थिक मंदी यांचे सह अस्तित्व असते, तेव्हा ही अवस्था येते. १९७० नंतर ही संकल्पना मांडण्यात आली. २००८ मध्ये भारतात ही अवस्था निर्माण झाली. ही अवस्था नियंत्रित करणे तुलनेने अवघड असते.




## प्रमाणानुसार वर्गीकरण

| रांगती भाववाढ (Creeping Inflation) | चालती भाववाढ (Walking or Galoping Inflation) | धावती भाववाढ (Running Inflation) | झंझावती भाववाढ (Hyper – Inflation) |
|---|---|---|---|
| जेव्हा वस्तूच्या किंमती वाढण्याचा वार्षिक दर १ ते ३ टक्के इतका असतो, तेव्हा त्या किंमतवाढीला रांगती भाववाढ असे म्हणतात. | वस्तूच्या किंमती वाढण्याचा वार्षिक दर ३ ते ७ टक्के दरम्यान असतो. त्याला चालती भाववाढ असे म्हणतात. ३ ते ५ टक्के मर्यादेतील भाववाढ अर्थव्यवस्थेच्या विकासाला सहाय्यक ठरते. | वस्तूंच्या किंमती वार्षिक १० ते २० टक्के इतक्या दराने वाढतात. त्या भाववाढीला धावती भाववाढ असे म्हणतात. | वस्तूच्या किंमती क्षणाक्षणाला वाढत जाऊन त्याचा वार्षिक दर २० ते १०० टक्के इतका असतो आणि किंमतवाढ अमर्यादित होते. अशा भाववाढीला झंझावती भाववाढ असे म्हणतात. विशेषत: युद्ध काळात अशा प्रकारची भाववाढ मोठया प्रमाणात आढळते. |

## चलनवाढीची कारणे

| मागणीच्या बाजुने | पुरवठयाच्या बाजुने |
|---|---|
| (वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ करणारे घटक) | (वस्तु व सेवांच्या पुरवठयात घट आणणारे घटक) |
| १. शासकीय खर्चात वाढ<br>२. तुटीचा अर्थभरणा<br>३. चलन अर्थभरणा<br>४. खाजगी खर्चात वाढ<br>५. लोकसंख्येत वाढ<br>६. काळा पैसा<br>७. अंतर्गत कर्जाची परतफेड<br>८. निर्यातीत वाढ<br>९. करांमध्ये घट<br>१०.स्वस्त पैशाचे धोरण | १. नैसर्गिक संकटे<br>२. औद्योगिक कलह<br>३. व्यापाऱ्यांची सट्टेबाजी<br>४. ग्राहकांची साठेबाजी<br>५. घटत्या फलाचा सिद्धांत<br>६. कृषी उत्पादनातील चढ-उतार<br>७. उत्पादन घटकांची दुर्मिळता |




### ❖ किंमतीवर परिणाम करणारे घटक :-

१. मागणी व पुरवठा
२. लोकसंख्या
३. उत्पन्न व उत्पादन मूल्य
४. वाढता चलनपुरवठा
५. पर्यायी वस्तूंची उपलब्धता
६. किंमतीच्या बाबतीतील अंदाज
७. व्यापाऱ्यांची साठेबाजी / कृत्रिम टंचाई
८. आंतरराष्ट्रीय घडामोडी

## ❖ किंमतवाढीची कारणे :-

### ❑ मागणीच्या बाजूचे घटक :-
- सार्वजनिक खर्चात वाढ – विकास योजना, अनुदान, आस्थापना खर्चात वाढ, अंतर्गत कर्जाची परतफेड इ.
- खाजगी खर्चात वाढ – वेतन वाढ, करकपात, कर्ज सवलत इ.
- विदेशी मागणीत वाढ – निर्यात वाढ, त्यामुळे देशातील मागणीच्या मानाने पुरवठा कमी होतो.
- पतविस्तार – तूटीचा अर्थभरणा, बँकांची पतनिर्मिती इ.

### ❑ पुरवठयाच्या बाजूचे घटक :-
- कृषी उत्पादनातील घट - कमी उत्पादकता, नैसर्गिक आपत्ती, रोगांच्या साथी इ.
- नैसर्गिक आपत्ती - अतिवृष्टी / अनावृष्टी, यातून उद्‌भवणारा दुष्काळ, टोळधाड, वादळ, भूकंप इ.
- उत्पादन घटकांची दुर्मिळता - उत्पादनाच्या घटकापैकी एखाद्या घटकाची टंचाई निर्माण झाल्यास उत्पादनवाढीच्या मार्गात अडथळे निर्माण होऊन पुरवठा कमी होतो.
- व्यापाऱ्यांची साठेबाजी – नफा वाढेल या अपेक्षेने साठेबाजीला चालना मिळते. व्यापारी कमी माल विक्रीला काढतात. त्यामुळे कृत्रीम टंचाई निर्माण होऊन किंमत वाढ
- पेट्रोलियम पदार्थाच्या किंमतीत वाढ - कृषी उत्पादनाप्रमाणेच पेट्रोलियम पदार्थाच्या किंमतीत वाढ ही सार्वत्रिक किंमत वाढीसाठी कारणीभूत ठरते.

❑ **वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ घडवून आणणारे घटक :-** अनेक अर्थतज्ज्ञ किंमत वाढीला मागणीतील वाढ हाच घटक प्रामुख्याने जबाबदार असल्याचे मानतात.

❑ **शासकीय खर्चातील प्रचंड वाढ :** सरकारचा (केंद्र तसेच राज्य सरकारांचा) विकास तसेच बिगर-विकास खर्च (उदा. युद्धजन्य परिस्थितीतील खर्च) प्रचंड प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे जनतेच्या हातातील खर्च योग्य उत्पन्न वाढते. म्हणून वस्तू व सेवांची मागणी वाढते व परिणामी, किंमती वाढतात.

❑ **तूटीचा अर्थभरणा :–** भारतासारख्या देशांत नेहमी तूटीचा अर्थसंकल्प मांडला जातो. मुद्दाम निर्माण केलेली राजकोषिय तूट भरुन काढण्यासाठी तूटीचा अर्थभरणा केला जातो. त्यासाठी बाजारातून मोठ्या व्याजदराने कर्जे घेतली जातात किंवा मोठ्या प्रमाणावर नोटा छापल्या जातात. मात्र राजकोषिय तूट प्रचंड वाढत गेल्याने तुटीचा अर्थभरणा सुद्धा वाढत गेला. त्यामुळे देशात चलनपुरवठा वाढत गेला. त्यामुळे लोकांच्या हातातील उत्पन्न वाढून त्यांची वस्तू व सेवांची मागणी वाढते. मात्र, तूटीच्या अर्थभरण्याचा मर्यादित व नियोजनपूर्वक वापर केल्यास उत्पादनातही वाढ होण्याची शक्यता असते. परिणामी, किंमत वाढ मर्यादित दराने होते.

❑ **चलन पुरवठ्यातील वाढ :–** चलन पुरवठा म्हणजे देशातील जनतेच्या हातातील एकूण पैसा होय. स्वातंत्र्यानंतर लोकांकडील पैशात प्रचंड वाढ झाली. RBI च्या धोरणांद्वारे व्यापारी बँका तसेच विकास बँकांनी विकासासाठी (शेती, उद्योग इत्यादींमध्ये गुंतवणूकीसाठी) खूप प्रमाणात कर्जे दिली. त्यामुळे जनतेच्या ताब्यातील पैसा वाढून वस्तू व सेवांची मागणी वाढली, त्यामुळे किंमती वाढल्या.

### ❑ खाजगी खर्चातील वाढ :–
- खाजगी उपभोग खर्चातील तसेच गुंतवणूक खर्चातील वाढीमुळे अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी वाढत असते.
- जेव्हा व्यावसायिक स्थिती चांगली असते तेव्हा खाजगी उद्योजक नवीन उद्योग व्यवसायात मोठया प्रमाणात निधीची गुंतवणूक करतात. त्यामुळे उत्पादन घटकांना अधिक मागणी येऊन घटक किंमतीमध्ये वाढ होते. त्यामुळे घटक मालकांच्या उत्पन्नामध्ये वाढ होते. परिणामत: वस्तू व सेवांवरील उपभोग खर्चात वाढ होते. म्हणजेच, खाजगी खर्चातील वाढीमुळे उत्पादन घटकांची तसेच वस्तू व सेवांची मागणी वाढत असते.

❑ **लोकसंख्येतील प्रचंड वाढ :–** लोकसंख्येत वेगाने वाढ होत असल्यास अन्नधान्य तसेच इतर वस्तू व सेवांची परिणामकारक मागणी प्रत्यक्षपणे वाढत असते. मात्र पुरवठा तेवढ्या प्रमाणात वाढत नाही. त्यामुळे किंमती वाढतात.

❑ **काळा पैसा :–** अर्थव्यवस्थेत प्रचंड प्रमाणावर निर्माण होणारा काळा पैसा आपली स्वत:ची समांतर अर्थव्यवस्था निर्माण करीत असतो. विनाकष्टाने मिळालेला हा काळा पैसा लपविणे अवघड असल्याने लोक तो चैनीच्या वस्तू, जमीन, लग्नसमारंभ इत्यादी बाबींवर खर्च करतात. तेवढ्या प्रमाणात मागणी वाढून किंमती वाढतात.

- **अंतर्गत कर्जाची परतफेड :–** सरकारने पूर्वी घेतलेल्या कर्जाची परतफेड लोकांना केल्यास त्यांच्या खरेदीशक्तीमध्ये वाढ होते. लोक उपभोग्य वस्तू व सेवांची मागणी करतात, त्यामुळे अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी नैसर्गिकरित्या वाढते.

- **निर्यातीमधील वाढ :–** काही कारणांमुळे देशी वस्तूंची निर्यात वाढल्यास त्यांचा देशांतर्गत उपलब्ध साठा कमी होऊन त्यांची टंचाई निर्माण होते. त्यामुळे मागणी वाढून भाववाढ होते.

- **करांमधील घट :-** सरकारने कर कपात केल्यास किंवा काही कर रद्द केल्यास लोकांचे खर्च योग्य उत्पन्न वाढते. वाढीव खरेदीशक्तीमुळे त्यांची वस्तू व सेवांची मागणी वाढते.

- **स्वस्त पैशाचे धोरण :–** मध्यवर्ती बँकेने स्वस्त पैशाच्या धोरणाचा अवलंब केल्यास व्यापारी बँकांकडून पतचलनविस्तार घडवून आणला जातो. त्याद्वारे बँका जनतेला जास्त कर्जे देतात. लोकांच्या हातातील पैसा वाढल्याने वस्तू व सेवांची मागणी वाढते.

## वस्तू व सेवांच्या पुरवठ्यात घट घडवून आणणारे घटक

- वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ झाल्याबरोबर त्यांच्या पुरवठ्यात सुद्धा तेवढयाच कालावधीत तसेच प्रमाणात वाढ झाली तर भाववाढीची समस्या निर्माण होत नाही. मात्र, पुरवठ्यात वाढ न होण्यासाठी खालील घटक कारणीभूत असतात.

१. कृषी उत्पादनातील चढ-उतार :– भारतीय कृषी मोठ्या प्रमाणात मोसमी पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे कृषी उत्पादनात मोठे चढ-उतार दिसून येतात. उदा. १९६४ – ६५ मध्ये ८९ दशलक्ष टन असलेले अन्नधान्य उत्पादन १९६५ – ६६ मध्ये ७२ दशलक्ष टन एवढे म्हणजेच, एका वर्षात २० टक्क्यांनी कमी झाले. तसेच, १९७०-७१ चे १०८ दशलक्ष टन हे विक्रमी उत्पादन हे पुढील दोन वर्षात ९७ दशलक्ष टनांपर्यंत कमी झाले. पुढे १९७८- ७९ चे १३२ दशलक्ष टन हे विक्रमी उत्पादन पुढील वर्षी ११० दशलक्ष टन एवढे म्हणजेच एका वर्षात सुमारे १७ टक्क्यांनी कमी झाले. त्यामुळे ज्यावर्षी उत्पादन कमी होते त्यावर्षी पुरवठा कमी झाल्याने किंमती वाढतात.

२. अपुरी औद्योगिक वाढ :– औद्योगिक उत्पादनांची मागणी वाढली मात्र विविध कारणांमध्ये औद्योगिक उत्पादनाची पुरेशी वाढ झाली नाही. वीज/ कच्चा मालाची टंचाई, वाहतुकीच्या समस्या, सरकार नियंत्रणे, तंत्रज्ञानाची कमतरता इ. त्यामुळे औद्योगिक उत्पादनांच्या किंमतींमध्ये वाढीची प्रवृत्ती अधिक असते.

३. उत्पादन घटकांची दुर्मिळता :– बऱ्याच वेळा श्रम, भांडवल, कच्चा माल यांसारख्या उत्पादन घटकांच्या टंचाईमुळे वस्तू व सेवांचे उत्पादन कमी होते. त्यामुळे भाववाढीची परिस्थिती निर्माण होते.

४. औद्योगिक कलह :– कामगार संघटनांच्या हातातील संपाचे हत्यार व त्याला प्रत्युत्तर म्हणून मालकवर्गाने जाहिर केलेली ताळेबंदी या दोघांचा परिणाम औद्योगिक उत्पादन घटीमध्ये होतो. त्यामुळे औद्योगिक वस्तूंचा पुरवठा कमी होऊन किंमत वाढीस चालना मिळते.

५. नैसर्गिक संकटे :- भूकंप, अवर्षण, पूर इत्यादींसारख्या नैसर्गिक संकटांमुळे कृषी उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. कमी कृषी उत्पादनामुळे काही औद्योगिक उत्पादनामध्ये देखील घट होते. त्यामुळे भाववाढीची परिस्थिती निर्माण होते.

६. व्यापारी वर्गाकडून केली जाणारी साठेबाजी व सट्टेबाजी :– भाववाढीच्या काळात भविष्यातील अपेक्षित भाववाढीचा फायदा करुन घेण्यासाठी व्यापारी वर्गात मालाची साठेबाजी करण्याची वृत्ती वाढते. त्यामुळे मालाची कृत्रिम टंचाई वाढते. त्यामुळे भाववाढीची परिस्थिती निर्माण होते.

७. ग्राहकांकडून केली जाणारी साठेबाजी :– भाववाढीच्या काळात ग्राहक देखील भविष्यातील भाववाढीच्या भितीने आवश्यक वस्तूंची साठेबाजी करीत असतात. त्यामुळे बाजारातील वस्तूंचा पुरवठा कमी होतो.

८. घटत्या उत्पादन – फलाच्या नियमाची कार्यवाही :– उद्योगसंस्थांमधील यंत्रे जसजशी जुनी होतात तशी त्यांची उत्पादन क्षमता कमी होते. तेथे घटत्या उत्पादन फलाच्या नियमाची कार्यवाही सुरु होते. त्यामुळे उत्पादनाच्या प्रतिनगाचा खर्च वाढून भाववाढीस चालना मिळते.

९. एकांगी उत्पादन :– बऱ्याच वेळा अर्थव्यवस्थेत चैनीच्या वस्तूंच्या उत्पदनावर भर दिला जातो. त्यामुळे आवश्यक वस्तूंच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष होते, त्यांची टंचाई निर्माण होते.

❖ **चलनवाढीचे परिणाम :-** प्रा. ब्रिज नरेन या भारतीय लेखकाने चलनवाढीची तुलना दरोडेखोराबरोबर केली आहे.त्यांच्या मते,


१. चलनवाढ व दरोडेखोर हे दोघेही लोकांची लूट करतात.
२. दरोडेखोराची लुट दृश्य असते तर चलनवाढीने केलेली लूट अदृश्य असते.
३. दरोडेखोर एक किंवा काही लोकांची लूट करतात. तर चलनवाढ सर्व लोक किंवा संपुर्ण राष्ट्राची लूट करतात.
४. दरोडेखोराला कायद्याच्या न्यायालयात खेचता येते, चलनवाढीच्या बाबतीत असे काहीही करता येत नाही.
५. दीर्घकाळ टिकून राहणाऱ्या चलनविस्तारामुळे राष्ट्राचे सामाजिक, आर्थिक, राजकिय तसेच नैतिक जीवन ढवळून निघत असते.

## ❖ चलनवाढीचे वितरणावरील परिणाम :–

- चलनवाढीमुळे उत्पन्न व संपत्तीच्या पूनर्वितरणावर प्रतिकूल परिणाम घडून येतात. उत्पन्न व संपत्तीचा प्रवाह तुलनात्मकदृष्ट्या कमी लवचिक उत्पन्न असलेल्या गटातील लोकांकडून (उदा. कामगार, पगारी नोकर वर्ग, निवृत्त व्यक्ती, शिक्षक इ.) अधिक लवचिक उत्पन्न असलेल्या गटातील लोकांकडे (उदा. उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक, सट्टेबाज इ.) वाहतो.
- समाजातील विविध वर्गावर उत्पन्नाच्या पूनर्वितरणाचे परिणाम पुढीलप्रमाणे होतात :–

### ❑ धनको व ऋणको :

- चलनवाढीच्या काळात ऋणकोंना (कर्जदारांना) लाभ होतो, तर धनकोंचे नुकसान होते.
- ऋणको व्यक्ती जेव्हा कर्ज घेते तेव्हा चलनाची खरेदी शक्ती अधिक असते. मात्र तो जेव्हा कर्जाची परतफेड करतो. तेव्हा तो धनकोला कमी खरेदी शक्ती परत करीत असतो. (किंमत वाढीमुळे चलनाची खरेदी शक्ती कमी झालेली असतात.)
- धनकोला मात्र त्याने दिलेल्या खरेदी शक्तीपेक्षा कमी खरेदी शक्ती परत मिळत असते.






### ❑ पगारी नोकर वर्ग :

- पगारी नोकर वर्गाचा पगार चलनवाढीच्या दरापेक्षा कमीच दराने वाढत असतो. तसेच, त्यांचा पगार निश्चित कालावधीनंतरच वाढत असतो, मात्र भाववाढीमुळे जीवनमानाचा खर्च सतत वाढत असतो. त्यामुळे या मधल्या काळात त्यांना भाववाढीचा मोठा फटका सहन करावा लागतो.



### ❑ मजुरी कमवणारा मजुरवर्ग :

- चलन वाढीचा या वर्गाला फायदा किंवा तोटा होऊ शकतो. जर त्यांची कामगार संघटना प्रभावी असेल तर मालकांना मजुरी वाढ देण्यास भाग पाडू शकतात. अर्थात मजुरी वाढ प्राप्त झाली तरी ती काही कालांतरानेच होत असते. मात्र असंघटित मजुरांना हे शक्य नसल्याने भाववाढीचा फटका त्यांना सहन करावाच लागतो.

❑ **निश्चित उत्पन्न मिळविणारा गट :** चलनवाढीचा सर्वाधिक फटका या व्यक्तींना बसतो. उदा. पेन्शनवर जाणारे निवृत्त कर्मचारी, व्याज व भाडे रुपाने उत्पन्न मिळविणारे लोक, तसेच निश्चित उत्पन्न देणाऱ्या रोखे, कर्जरोखे, ठेवी इत्यादींच्या उत्पन्नावर जगणारे लोक.

❑ **गुंतवणूकदार :**
- सामान्यपणे गुंतवणूक दोन प्रकारची असते - (१) शेअर्समधील, (२) डिबेंचर्स, बॉंडस् इ. मधील.
- चलनवाढीचा शेअर्समधील गुंतवणूकदारांना फायदा होतो. कारण नफा वाढल्याने कंपन्या भागधारकांना अधिक दराने लाभांश वाटतात. मात्र डिंबेचर्स, बॉंडस् इ. वर पूर्वीच्याच निश्चित ठरलेल्या दराने व्याज मिळते. त्यातील गुंतवणूकदारांचे वास्तव उत्पन्न कमी होते.

❑ **उद्योजक – व्यावसायिक :**
- यांच्यासाठी चलनविस्ताराचा कालावधी एक सुवर्णकाळच असतो.
- उत्पादक, व्यापारी, व्यवसायिक या सर्वांना त्याचा फायदा होतो. उत्पादक व्यापाऱ्यांच्या मालसाठ्यांच्या किंमतीत वाढ होते, त्यामुळे त्यांना फायदा होतो.
- तसेच, उत्पादकांसाठी ज्या दराने वस्तूंच्या किंमती वाढतात त्या दराने लगेच उत्पादन खर्चात वाढ होत नाही. त्यामुळे त्यांना नफा प्राप्त होतो.

❑ **शेतकरी :**
- चलनवाढीच्या कालावधीत जमिनदारांना तोटा होतो, कारण त्यांना मिळणारे जमिनीचे भाडे निश्चित असते.
- मात्र स्वत:च्या मालकीची जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना फायदा होतो. शेतमालाच्या किंमती ज्या वेगाने वाढतात त्या वेगाने त्यांचा उत्पादन खर्च वाढत नाही. किंमत वाढीमुळे त्यांचा नफा वाढतो. अर्थात, मोठ्या शेतकऱ्यांना याचा जास्त फायदा होतो. लहान शेतकऱ्यांकडे विक्रेय वाढावा कमी असल्याने त्यांना अत्यल्प फायदा होतो.

❑ **सरकार :** ऋणको म्हणून सरकारला चलनवाढीचा फायदा होतो. सरकारी कर्जरोखे, बॉंडस् इ. वरील व्याजदर निश्चित असतो. चलनवाढीमुळे तो वाढविला न जात असल्याने धनकोंना मात्र तोटा होतो.

## इतर परिणाम

- **सरकार** :- चलनवाढीदरम्यान लोकांचे उत्पन्न वाढत असल्याने सरकार उत्पन्नावरील व वस्तूंवरील कर वाढवते, त्यांच्या महसूलात भर पडतो. मात्र सरकारचा विविध प्रकल्पांवरील खर्च वाढतो. ते वेळेवर पूर्ण होत नाही.
- **व्यवहार तोल** :- भाववाढीमुळे व्यवहारतोलावर प्रतिकूल परिणाम होतो. देशांतर्गत वस्तू महाग बनल्याने परदेशी वस्तू त्यामानाने स्वस्त वाटतात. त्यामुळे आयात वाढते. मात्र निर्यात कमी होते. कारण देशातील वस्तूंची परदेशात स्पर्धाशक्ती कमी होतो.
- **विनिमय दर** :– जर देशातील किंमती परदेशातील किंमतीपेक्षा वेगाने वाढत असतील तर देशी चलनाचा परकीय चलनाच्या संदर्भातील विनिमय दर कमी होतो.
- **सामाजिक परिणाम** :– गरिब व श्रींमतांमधील दरी वाढते. गरीबांच्या मनात श्रीमंताबद्दल द्वेष व मत्सर निर्माण होतो. त्यातून सामाजिक संघर्ष निर्माण होतो. नैतिकता व नितीमूल्य घसरतात.
- **राजकीय परिणाम** :– सामाजिक संघर्षातून राजकीय संघर्ष निर्माण होतो. राजकिय अस्थैर्य निर्माण होण्याचा धोका उद्‌भवतो.

## ❖ किंमतवाढीस आळा घालण्याचे उपाय :-

- किंमतवाढीवर नियंत्रण ठेवण्याची संयुक्तिक जबाबदारी भारतीय रिझर्व्ह बँकेची तसेच भारत सरकारची असते. रिझर्व्ह बँकेचे उपाय मागणीवर नियंत्रण करण्याशी संबंधित असतात, तर भारत सरकार मागणी तसेच पुरवठ्यावरील नियंत्रणाचे कार्य करते. किंमतवाढीस आळा घालण्याच्या उपायांचे वर्गीकरण पुढीलप्रकारे केले जाते.

  **अ) चलनविषयक उपाय : हे उपाय भारतीय रिझर्व्ह बँकेमार्फत हाती घेतले जातात. चलन पुरवठ्यावर नियंत्रण ठेवून अर्थव्यवस्थेतील मागणी नियंत्रित करणे ही रिझर्व्ह बँकेची जबाबदारी असते. त्या अंतर्गत रिझर्व्ह बँक पुढील उपाय योजते.**

- पतनियंत्रण – या अंतर्गत पतचलन संकोच घडवून आणण्यासाठी मध्यवर्ती बँक अनेक मार्गाचा अवलंब करते. उदा. बँकदर, CRR, SLR इ. मध्ये वाढ, खुल्या बाजारात रोख्यांची विक्री, तसेच काही निवडक / गुणात्मक साधनांचा वापर. उदा. गाळा वाढविणे, उपभोग कर्जाचे नियंत्रण इत्यादी. अधिक किंमतींच्या नोटा चलनातून काढून घेणे. काळा पैसा देशात मोठ्या प्रमाणावर असल्यास या मार्गाचा अवलंब केला जातो.


**ब) राजकोषिय / वित्तीय उपाय : यात सरकारने घ्यावयाच्या उपायांचा समावेश होतो. हे उपाय रिझर्व्ह बँकेच्या धोरणाला पूरक कार्य करतात.** यात सरकारी जमा-खर्चाबाबत पुढील बाबींचा समावेश होतो.

१. अनावश्यक खर्चात कपात –सरकारच्या बिगर योजना खर्चात कपात करुन कामगार, सरकारी नोकर, उपभोक्त यांच्याजवळील पैसा कमी करुन चलनवाढ नियंत्रित करणे.
२. करांमध्ये वाढ –वैयक्तिक उपभोग खर्च कमी करण्यासाठी, सरकार वैयक्तिक कंपनी तसेच वस्तूंवरील कर वाढविते. तसेच नवीन कर आकारणी केली जाते. मात्र कर आकारणीमुळे बचती गुंतवणूक व उत्पादन कमी होणार नाही याची खबरदारी सरकारला घ्यावी लागते.
३. बचतींमध्ये वाढ –जीवनमान खर्च वाढलेल्या असल्याने लोक ऐच्छिकरित्या बचत करण्यास तयार नसतात. म्हणून जे. एम्. केन्स यांनी सक्तीची बचतीची शिफारस केली आहे. यात पुढील बाबींचा समावेश होतो:- सार्वजनिक कर्जावर मोठा व्याज दर देऊ करणे, आकर्षक बचत योजना सुरु करणे, सक्तीच्या पेन्शन व प्रॉव्हिडंड फंडाच्या योजना राबविणे इत्यादी.
४. शिलकी अंदाजपत्रक मांडणे - चलनवाढीच्या कालावधीत सरकारने तुटीचा अर्थसंकल्प मांडून तूटीचा अर्थभरणा करु नये. याउलट जमा वाढवून खर्च कमी करण्यासाठी शिलकी अर्थसंकल्प मांडावा.
५. सार्वजनिक कर्ज –सरकारने चलनवाढ नियंत्रित होईपर्यंत सार्वजनिक कर्जाची परतफेड थांबविली पाहिजे. तसेच जास्तीची कर्जे घेऊन लोकांजवळील पैसा कमी करण्याचा प्रयत्न करायला हवा.

**क) इतर उपाय :** यांमध्ये पुरवठा वाढवून मागणी कमी करणाऱ्या उपायांचा समावेश होतो.

१. अन्नधान्यांचे उत्पादन वाढविणे. विशेषत: अन्नधान्य, कापड, रॉकेल, खाद्यतेल, साखर, भाज्या इ. सारख्या गरजेच्या वस्तूंचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करणे.
२. औद्योगिक उत्पादन वाढविणे. त्यासाठी आवश्यक असलेली औद्योगिक शांतता प्रस्थापित करणे.
३. लोकसंख्या वाढीस आळा घालणे.
४. योग्य मजुरी धोरण - चलनवाढीचा दर अधिक असल्यास सरकारने मजुरी, उत्पन्न, नफा, लाभांश, बोनस इ. बाबींबर आणायला हवी मात्र यामुळे कामगारांचा असंतोष वाढण्याची शक्यता असल्याने मजुरीतील वाढीवर प्रत्यक्ष संबंध उत्पादकतेशी जोडायला हवा.
५. किंमत नियंत्रण - गरजेच्या वस्तूंच्या कमाल किंमती कायद्याने ठरवायला हव्या. त्यापेक्षा जास्त किंमत आकारणाऱ्यास कायद्याने सजा देण्यात यावी. मात्र याप्रकारे किंमत नियंत्रण अवघड असते.
६. सार्वजनिक वितरण व्यवस्था – याद्वारे पुढील दोन बाबी साध्य करण्यात येतात –
   १) गरजेच्या वस्तू कमी किंमतींना विकल्या जातात.
   २) दारिद्र्यरेषेखालील लोकांना जीवनाश्यक वस्तू स्वस्त दरात प्राप्त होतात.

## अर्थव्यवस्थेतील चक्रे




आर्थिक विकास होणे ही अर्थव्यवस्थेला हवी असलेली स्वाभाविक प्रक्रिया असते. पण काही अर्थशास्त्रीय कारणांमुळे आर्थिक विकासात घट येऊन मंदीची अवस्था येऊ शकते. अर्थव्यवस्था विशिष्ट चक्रांमधून जाते. याला व्यापारचक्र असे म्हणतात. खालील टप्प्यांमधून मंदीची अवस्था येते.

१. **सुस्ती (Slackness)** : अर्थव्यवस्थेत काही अर्थशास्त्रीय कारणांमुळे मागणी कमी होते. चलनघट होते, बचतदरात वाढ होते, गुंतवणूकीत घट होते अशा परिस्थितीला 'सुस्ती' म्हणतात.
२. **स्तब्धता (Stagnation)** : वरील सुस्ती बराच काळ राहिल्यास मागणी एकदम कमी होते. सर्व आर्थिक व्यवहार थांबल्यासारखे होतात. या अवस्थेला 'स्तब्धता' म्हणतात. या अवस्थेत चलनघट झालेली असते. परंतु काही वेळेस स्तब्धतेसोबतच चलनवाढ झालेली असेल, तर त्या अवस्थेला 'Stagflation' म्हणतात. शासनाने योग्य धोरणे राबविल्यास मंदीची अवस्था येऊ शकते.

३. **प्रतिसरण/घसरण (Recession) :** वरील स्तब्धता अधिक काळ राहिल्यास प्रतिसरणाची अवस्था येते. या काळात शासनाला हस्तक्षेप करुन चलनवाढीची अवस्था निर्माण करुन अर्थव्यवस्थेला या चक्रातून बाहेर काढण्याचे आटोकाट प्रयत्न करावे लागतात.


४. **मंदी (Depression) :** प्रतिसरणाची अवस्था अधिक काळ राहिल्यास मंदीची अवस्था येते. तीव्र चलनवाढ होते, वस्तूंची मागणी जवळपास शून्य होते. कारखाने, कंपन्या - उद्योग बंद पडतात. प्रचंड बेरोजगारी वाढते. अर्थव्यवस्थेवर शासनाचा ताबा सुटतो. या गंभीर अवस्थेला मंदी म्हणतात. १९२९ मध्ये जगाने अशी मंदी पाहिली. या मंदीला 'Depression' असेच संबोधतात. अलीकडे २००८ मध्ये पाश्चिमात्य देशात तसेच २०११ मध्ये युरोपीयन देशात उद्‌भवलेलं आर्थिक संकट व्यापारचक्रातील तिसऱ्या अवस्थेतील 'प्रतिसार – Recession' टप्प्यातील आहे.

५. **पुनरुत्थान (Revival) :** मंदीच्या अरिष्ट चक्रातून बाहेर येण्यासाठी कडक चलनविषयक व राजकोषीय धोरणांचा वापर करुन परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला जातो. एकदा मागणी वाढली की हळूहळू उत्पादन वाढू लागते. उत्पादक कार्ये घडू लागल्यामुळे लोकांच्या हातात पैसा यायला लागतो आणि परिस्थिती पूर्ववत होण्याची चिन्हे दिसू लागतात.

६. **तेजी/मुद्राफिती (Inflation) :** मागणी वाढली की किंमती वाढायला लागतात. स्वस्त पैशाच्या चलनविषयक धोरणांमुळे पैशाचा पुरवठा वाढतो. यामुळे महागाई निर्माण होते. अर्थव्यवस्थेत तेजी निर्माण होते. अर्थव्यवस्थेत तेजी निर्माण होते. काही तज्ज्ञ सुस्ती व स्तब्धता या अवस्थांना प्रतिसरणाचीच पूर्व पोटअवस्था समजतात. त्यामुळे व्यापारचक्रांचा क्रम खालीलप्रमाणे लावता येतो. प्रतिसरण – मंदी – पुनरुत्थान

## चलननीती (मुद्राधोरण)




- व्यवहारातील पैशाचा पुरवठा, पैशाची उपलब्धता, खर्च यात बदल करण्यासाठी चलनसत्तेने जाणीवपूर्वक केलेली कारवाई म्हणजे 'चलननीती' होय. एकूण चलननीती किंवा मुद्राधोरण ही व्यापक संकल्पना असून पतनियंत्रण धोरण हा त्याचा एक भाग आहे. जनतेला चलनाचा पुरवठा करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे याची जबाबदारी आरबीआय वर आहे. आरबीआय ही चलननीति मुख्यत: पतनियंत्रण धोरणाच्या माध्यमातून राबविते.

### ❖ चलन नीतीची उद्दिष्टे :-

१. किंमतीचे स्थिरीकरण
२. आर्थिक विकास
३. विनिमय नियंत्रण
४. व्यापारी चक्रांचे नियंत्रण

## किंमत निर्देशांक

- किंमतींचा परिणाम वस्तू व सेवा यांच्या पध्दती, प्रमाण आणि जनतेची क्रयशक्ती यांवर होतो. किंमत निर्देशाक हे वस्तूंच्या किंमतीच्या स्तरामध्ये होणारे तुलनात्मक बदल मोजण्याचे एक सांख्यिकी साधन आहे. ग्राहक किंमती निर्देशांक व घाऊक किंमती निर्देशांक ही अनुक्रमे किरकोळ व घाऊक स्तरावरील चलनवाढ मोजण्याची साधने आहेत. निर्देशांकावरून वस्तूंची किंमत वाढली किंवा घटली हे निदर्शनास येते.

### ❖ घाऊक किंमत निर्देशांक –(WPI) :-

- एका विशिष्ट वर्षातील वस्तूंची घाऊक किंमत पातळी निश्चित करून त्याआधारे वस्तूंच्या किंमती वाढण्याचा कल मोजला जातो. या मूल्य पातळीलाच घाऊक किंमतीचा निर्देशांक असे संबोधले जाते. घाऊक किंमती निर्देशांकाचा वापर मोठया प्रमाणावर शासन, बँका, औद्योगिक आणि व्यावसायिक वर्तुळात केला जातो. महत्त्वाच्या आर्थिक आणि वित्तीय धोरणातील बदल हे बऱ्याचदा घाऊक किंमती निर्देशांकातील चढ-उताराशी निगडीत असतात. घाऊक किंमती निर्देशांकातील चढ-उतारांच्या तीव्रतेवर कच्च्या मालाचा पुरवठा, यंत्रसामग्री आणि बांधकाम यातील सेवांचे दर अवलंबून असतात. घाऊक किंमतीचा निर्देशांक दर आठवडयाला काढला जातो.

### ❑ आधारभूत वर्ष –

- घाऊक किंमतीचा निर्देशांक काढण्यासाठी एक मूळ वर्ष निश्चित केले जाते. या वर्षातील ठराविक वस्तूंच्या किंमती लक्षात घेऊन निश्चित किंमतीचा निर्देशांक तयार केला जातो.
- स्वातंत्र्यानंतर १९५२-५३, १९६१-६२, १९७०-७१, १९८१-८२, १९९३-९४ वर्ष आधारभूत वर्ष मानली गेली. यानंतर प्रो. अभिजित सेन कार्यगटाच्या शिफारशीवरुन सप्टेंबर २०१० पासून २००४-०५ हे आधारभूत वर्ष स्वीकारण्यात आले. २०१२ मधील डॉ. सौमित्रा चौधरी कार्यगटाच्या शिफारशीवरुन मे २०१७ मध्ये '२०११-१२' हे नवीन आधारभूत वर्ष स्वीकारण्यात आले आहे. आधारभूत वर्षाला WPI १०० समजला जातो. समजा, २०११-१२ मध्ये WPI १०० आहे आणि २०१२-१३ मध्ये तो १०५ झाला, याचा अर्थ २०१२-१३ मध्ये WPI आधारित महागाईचा दर ५% आहे.

### ❑ वस्तू –

- निर्देशांक तयार करण्यासाठी ठराविक वस्तूंची निवड करुन त्यांच्या मूळ किंमती अभ्यासात घेतल्या जातात. १९९३-९४ मध्ये ४३५ वस्तू तर २००४-०५ पासून एकूण ६७६ वस्तू विचारात घेतल्या जातात. परंतु यामध्ये सेवांचा समावेश होत नाही.
- मे २०१७ पासून २०११-१२ वर्ष स्वीकारल्यामुळे आता वस्तूंची संख्या ६९७ झाली असून, किंमत नमुन्यांची संख्या ८,३३१ झाली आहे. ६७६ वस्तूंपैकी १४६ जुन्या वस्तू वगळण्यात आल्या व १९९ नवीन वस्तू वाढविण्यात आल्यामुळे वस्तूंची संख्या ६९७ झाली आहे.

**WPI वस्तू आणि भार**


| जुनी पध्दत - आधारभूत वर्ष २००४-०५ | | | | |
|---|---|---|---|---|
| | घटक | भार | वस्तू | नमुने |
| १ | प्राथमिक वस्तू | २०.१२% | १०२ | ५७९ |
| २ | इंधन व ऊर्जा | १४.९१% | १९ | ७२ |
| ३ | उत्पादित वस्तू | ६४.९७% | ५५५ | ४,८३१ |
| | एकूण | १००% | ६७६ | ५,४८२ |
| **नवी पध्दत - आधारभूत वर्ष २०११-१२** | | | | |
| | घटक | भार | वस्तू | नमुने |
| १ | प्राथमिक वस्तू | २२.६२% | ११७ | ९८३ |
| २ | इंधन व ऊर्जा | १३.१५% | १६ | ४४२ |
| ३ | उत्पादित वस्तू | ६४.२३% | ५६४ | ६,९०६ |
| | एकूण | १००% | ६९७ | ८,३३१ |

## ❖ ग्राहक किंमत निर्देशांक :–

- एका विशिष्ट वर्षातील जीवनावश्यक वस्तू व सेवांची किरकोळ किंमत पातळी निश्चित करुन त्याआधारे वस्तूंची किंमत वाढण्याचा कल मोजला जातो, या मूल्य पातळीला किरकोळ किंमतीचा निर्देशांक असे संबोधले जाते. किरकोळ किंमतीच्या निर्देशांक दर महिन्याला काढला जातो.
- किरकोळ किंमतीच्या निर्देशांकाला Cost of Living Index असेही संबोधले जाते. या निर्देशांकावरुन वस्तूंची किंमत वाढली किंवा घटली हे निदर्शनास येते.
- लोकसंख्येच्या वेगवेगळ्या गटांची उपभोग प्रवृत्ती वेगवेगळी असते. त्यानुसार किरकोळ किमंतीचा निर्देशांक चार प्रकारे काढला जातो. – CPI(W), CPI(AL), CPI (UNME) व CPI (RL). या प्रत्येकाचे आधारभूत वर्ष भिन्न आहे. हा निर्देशांक देशातील औद्योगिकदृष्टया विकसित अशा निवडक ७० केंद्रांमधील जीवनावश्यक वस्तू व सेवा यांच्या किरकोळ किंमतीवर आधारित असून त्यापैकी मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर व नाशिक ही पाच केंद्रे राज्यातील आहेत.
- औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांकाचा (CPI - IW) वापर वर्गीकृत रोजगारातील किमान वेतन निश्चित करणे व सुधारित करणे यासाठी केला जातो. तसेच सार्वजनिक क्षेत्रातील लाखो कर्मचाऱ्यांना देण्यात येणारा महागाई भत्ता ठरविण्यासाठी केला जातो.

## ❑ CPI साठी नवीन शृंखला :-

- जानेवारी २०११ मध्ये CSO ने ग्राहक किंमत निर्देशांकासाठी (CPI) २०१० हे आधारभूत वर्ष मानून नवीन शृंखला जाहीर केली. यानुसार २०१० मधील निर्देशांक १०० गृहीत धरुन त्याच्या आधारे CPI चे तिन्ही निर्देशांक निश्चित केले. CPI (IW) च्या निश्चितीसाठी ३१० शहरांचा तर CPI (RW) साठी एकूण ११८१ खेडयांचा सर्वेक्षणामध्ये समावेश करण्यात आला .




*Source: BLS; The most recent reweighting was in December 2017.*

## ❑ ग्राहक किंमत निर्देशांकासाठी नवीन आधार वर्षे

- केंद्रिय सांख्यिकी आयोगाने फेब्रुवारी २०१५ मध्ये ग्राहक किंमत निर्देशांकाची नवीन संरचना जाहीर केली. त्यानुसार ग्राहक किंमत निर्देशांकासाठी २०१२ हे आधारभूत वर्ष मानण्यात येणार आहे. यापूर्वी २०१० हे आधारवर्ष मानण्यात येत होते. त्याचप्रमाणे निर्देशांक काढण्यासाठी ग्राह्य धरण्यात येणाऱ्या वस्तूंच्या संख्येत वाढ करण्यात येणार आहे.
- नवीन किंमत निर्देशांकात अन्नघटकांना कमी महत्त्व देण्यात येणार असून त्याऐवजी पान, तंबाखू, शिक्षण, वैद्यकीय आणि मादक पदार्थ यांना अधिक महत्त्व देण्यात येणार आहे.

| आधारभूत वर्ष | ग्रामीण भाग (वस्तू) | शहरी भाग (वस्तू) |
|---|---|---|
| २०१० (१००) | ४३७ | ४५० |
| २०१२ (१००) | ४४८ | ४६० |

# महाराष्ट्रातील किंमती विषयक स्थिती

- अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे तर्फे राज्याच्या ग्रामीण व नागरी भागांकरिता स्वतंत्र मासिक ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००३) तयार करण्यात येतात. ग्रामीण भागातील ६८ केंद्रांमधून १०६ वस्तू व ७४ नागरी केंद्रांमधून १२७ वस्तू यांच्या साप्ताहिक किरकोळ किंमती संकलित केल्या जातात.

## ❖ घाऊक किंमत निर्देशांक :-

- एप्रिल, २०११ मध्ये राज्यातील घाऊक किंमत निर्देशांक १५२.१ होता. त्यात वाढ होवून तो जानेवारी, २०१२ मध्ये १५७.७ इतका झाला. एप्रिल २०११ ते जानेवारी २०१२ या कालावधीत सरासरी घाऊक किंमती निर्देशांकावर आधारित चलन वाढीचा दर ९.१ टक्के होता, जो गतवर्षीच्या तत्सम कालावधीतील ९.६ टक्के पेक्षा कमी होता.

## ❖ सार्वजनिक वितरण व्यवस्था :-

- जनतेला वाजवी दरात अन्नधान्य उपलब्धतेची हमी तसेच गरीबांच्या अन्न सुरक्षेत वाढ या शासनाच्या आर्थिक धोरणामधील महत्त्वाचे साधन म्हणून सार्वजनिक वितरण व्यवस्था विकसित झाली. ती दारिद्रय निर्मूलन कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा घटक असून कुपोषणाचा धोका असलेल्या बहुसंख्य गरीबांसाठी संरक्षण जाळे म्हणून या व्यवस्थेचा उपयोग होतो.
- रास्त भाव दुकानांचे जाळे निर्माण करुन अन्नधान्याचे नियतन व वितरण करणे, दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची निश्चिती करणे, शिधापत्रिका देणे आणि रास्त भाव दुकानांचे नियंत्रण इ. ची जबाबदारी राज्यशासनाची आहे.

- ३१ डिसेंबर २०११ अखेर राज्यात ५०,६४५ रास्त भाव दुकाने कार्यरत होती. त्यांची नियमित निरीक्षणे घेतली जातात. २०११ मध्ये ऑक्टोबर अखेरपर्यंत ४९,४०५ रास्त दुकांनाची निरिक्षणे घेण्यात आली असून ५३१ दुकांनाचे परवाने रद्द करण्यात आले आणि रु.२.१२ कोटी इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

## ❖ नियंत्रित (लेव्ही ) साखर :-

- केंद्र शासनाने, एकूण साखर उत्पादनातील खुल्या बाजारात विकण्यात येणारी साखर व नियंत्रित (लिव्ही) साखर यांचे प्रमाण ९:१ असे निश्चित केले आहे. अशा प्रकारे गोळा करण्यात आलेली नियंत्रित साखर सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत दारिद्रय रेषेखालील कुटूंबांना वितरित करण्यात येते.

## ❖ केरोसीन :

- सद्य स्थितीत मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात केरोसीनची किरकोळ किंमत रुपये १४.१० प्रति लिटर आहे. तर इतर जिल्ह्यांमध्ये ती रुपये १४.१० ते रुपये १६.२५ प्रति लिटर या दरम्यान आहे. केरोसीनच्या गैरवापर टाळण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या केरोसीनचा रंग निळा करण्यात आला आहे व ते फक्त शिधापत्रिका धारकांनाच देण्यात येते.

## ❖ गोदामे :

- राज्यात २०११-१२ मध्ये १,०३९ गोदामे उपलब्ध असून त्यांची साठवण क्षमता ५.६८ लाख मेट्रिक टन आहे. नवीन गोदामांच्या उभारणीसाठी राज्य शासनाने मान्यता दिली असून २०११-१२ मध्ये रुपये ३६.८८ कोटी इतका निधी मंजूर केला आहे व २१ जिल्ह्यांमध्ये गोदामे उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. यापैकी पहिले तीन निर्देशांक श्रम ब्युरो, सिमला यांच्याकडून संकलित व प्रकाशित केले जातात. तर शेवटच्या निर्देशांक केंद्रिय सांख्यिकी संघटना, भारत सरकार यांचेकडून संकलित व प्रकाशित केला जातो.
- औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमत निर्देशांक (CPI-IL) – सरकारी तसेच खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ठरविणारा हा निर्देशांक देशातील ७० केंद्रवरुन ठरवितात. यात महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपुर, सोलापुर व नाशिक या पाच केंद्रांचा समावेश होतो.

| CPI चा प्रकार | वस्तु व सेवांची संख्या | आधारभुत वर्ष |
|---|---|---|
| १) CPI–IW (Industrial Worker) | २६० | २००१ |
| २) CPI–AI (Agricultural Labourers) | ६० | १९८६-८७ |
| ३) CPI–RL (Rular Labourers) | १८० | १९८६-८७ |
| ४) CPI–UNME (Urban Non Manual Employees) | १८० | १९८४-८५ |

- **शेतमजुरांकरीता ग्राहक किंमत निर्देशांक** – शेतमजुरीचा किमान दर निश्चित करण्यासाठी असलेल्या या निर्देशांकासाठी देशातील ६०० गावांची (केंद्र) निवड करण्यात आली आहे.
- **नागरी श्रमिकेत्तर कर्मचाऱ्यांकरीता ग्राहक किंमत निर्देशांक (CPI-UNME)** – सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या काही परकीय कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ठरवितांना तसेच आयकर कायद्याअंतर्गत भांडवली नफ्याचे प्रमाण ठरविण्यासाठी या निर्देशांकाचा वापर होतो. मार्च २००८ पासून केंद्रिय सांख्यिकीय संघटनेने हे निर्देशांक प्रकाशित करणे खंडित केले आहे. सध्या श्रम ब्युरोंनी प्रकाशित केलेल्या औद्योगिक कामगारांचा निर्देशांक आणि नागरी श्रमिकेत्तर कर्मचाऱ्यांचा निर्देशांक एकत्रित करुन गुणोत्तर पद्धतीने संलग्न निर्देशांक काढला जातो.

## महत्त्वाच्या संकल्पना

१. **Black Money (काळा पैसा)** - एखाद्या देशाच्या मौद्रिक व्यवहारामध्ये असणारा पैसा परंतु जो कायदेशीर व्यवहारामध्ये नाही, बेकायदेशीर असतो, त्यास काळा पैसा असे म्हणतात. यामुळे देशाच्या विकासाच्या प्रयत्नांमध्ये अडचणी निर्माण होतात. याला समांतर नाणेबाजार असेही म्हणतात. भारतात सुमारे २०% काळा पैसा असण्याचा अंदाज आहे.

२. **हवाला** - जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यवहारामध्ये बेकायदेशीररीत्या परकीय चलनाचा व्यापार करण्यात येतो, तेव्हा त्यास हवाला असे म्हणतात. कर बुडविणारे, बेकायदेशीर उद्योजक किंवा आतंकवादी अशा प्रकारे व्यवहार करतात.

३. **विमुद्रीकरण** - काळा पैसा कमी करण्यासाठी जेव्हा सरकार १००००, ५०००, १००० व ५०० इ. वरील नोटा / चलने व्यवहारातून बाद करते, तेव्हा त्यास विमुद्रीकरण म्हणतात.

४. S.D.R. – Special Drawing Right / Resource (विशेष आहारण हक्क) – IMF आणि जागतिक बँकेकडे असलेला सदस्य देशांचा पतपैसा म्हणजे S.D.R होय. यास Paper Gold असे म्हणतात. ही पद्धत १९७१-७२ पासून अस्तित्वात आली.

## महत्त्वाच्या संकल्पना

५. **विदेशी गंगाजळी** – सरकारकडे असणारे विदेशी चलन, अधिक सुवर्ण, अधिक S.D.R म्हणजे विदेशी निधी / गंगाजळी होय. सध्या भारताची विदेशी गंगाजळी सुमारे १५० मिलियन डॉलर्स आहे.

६. **मनी लाँडरिंग** – म्हणजे काळ्या पैशाचे अस्तित्व, उगम आणि वापर लपविण्याचा वा नाकारण्याचा प्रयत्न होय. मनी लाँडरिंगसाठी कधी कायद्यातील पळवाटांचा आधार घेतला गेला तर कधी काही देशांचे कायदे याला पूरक ठरले.

७. **मुद्रा अवपात** (Stagflation) – स्टॉगफ्लेशन म्हणजे Stagnation + Inflation होय. म्हणजेच चलनघट व चलनवाढीचे सहअस्तित्व म्हणून त्याला चलनविस्तारात्मक चलसंकोच असेही म्हणतात. तेजी व मंदीची लक्षणे एकत्रितपणे आढळून येणारी अर्थव्यवस्थेची स्थिती.

८. **मुद्रा अपस्फिती** (Disinflation) – चलनवाढ होत असतांना चलनवाढीचा दर कमी-कमी होत असेल तर त्या परिस्थितीला 'डिस्इन्फ्लेशन' असे म्हणतात.

९. **मुदा संस्फीती** (Reflation) –तीव्र मंदी दूर करण्यासाठी सरकारने मुद्दाम घडवून आणलेली तेजीची / चलनवाढीची परिस्थिती म्हणजे मुद्रा संस्फीती होय.

१०.**चलन विस्तार** (Inflation) –भाव फुगवन म्हणजेच 'चलन विस्तार' होय. यामध्ये चलनी उत्पन्नातील वाढ वास्तव उत्पन्नातील वाढीपेक्षा अधिक असते अणि जसजशी भाववाढ होते तसे-तसे चलन मुल्य घसरत जाते.

११.**डॉ.बाबासाहेब आंबेडकर** यांची मुद्रा असलेली चलन नाणी १९९१ मध्ये वितरित केल्या गेली.

१२.**जिफेन वस्तु** (Giffen Goods) - अधिक किंमतींना ज्यांची मागणी वाढते, मात्र कमी किंमतींना ज्यांची मागणी कमी होते अशा वस्तूंना जिफेन वस्तू असे म्हणतात.

★★★★★★★★★★★★★★★★★★★★